# स्नेहबंध

## गणेशोत्सव विशेषांक

सप्टेंबर २०२६

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट
एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ



" आपले मंडळ "

|| Maharashtra Mandal of Detroit ||

Est. 1977

# Dhake Industries

## The Future of Coatings





- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More






- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet market and Customer Specific Requirements

**Global Headquarters**
15169, Northville Rd, Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | ४९ Not Out — एका MMDian चा प्रवास | प्राजक्ता कुलकर्णी - काणे | ४ |
| २ | गणपती: केवळ ईश्वर नव्हे, एक वैज्ञानिक व तात्विक रुपक! | अभिजित जोगदेव | ६ |
| ३ | मनीषा डोंगरे: नाचे मयुरी | उल्का भिडे /ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | १० |
| ४ | आठवणींच्या हिंदोळ्यात | सुभाष केळकर | १४ |
| ५ | का बरं का ? | विभावरी देशपांडे | १८ |
| ६ | घावन घाटले | जान्हवी पटवर्धन | २० |
| ७ | जन्म सत्यवान भव | वीणा शाह | २२ |
| ८ | आरोग्यम् धनसंपदा (Health is Wealth) | Anju Vale | २९ |
| ९ | ५० वर्षांचे महाराष्ट्र मंडळ | शुभदा ताई कुलकर्णी | ३६ |
| १० | ऋषीची भाजी | आदित्य दांडेकर | ३८ |
| ११ | संतमहात्म्य | अरुणा मुल्हेरकर | ४० |
| १२ | एक दुरावा असा धरावा | राजन (निरंजन) | ४२ |
| १३ | Morning Sprint | Reghu Neelakanthan | ४४ |
| १४ | Troy Marathi Shala | Various Artists | ४६ |
| १५ | Canton Marathi Shala | Various Artists | ४६ |



**संपादक**
स्नेहा विपट

**मुखपृष्ठ, रचना व मांडणी**
देवेंद्र चितळे

**स्नेहबंध समिती**
देवदत्त कुलकर्णी बागेश्री नाईक प्राची चितळे



लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

# ४९ Not Out — एका MMDian चा प्रवास

काही प्रवास आपण ठरवून सुरू करतो... आणि नकळत तो प्रवास आपल्याला घडवत जातो. माझा MMD सोबतचा प्रवास असाच काहीसा आहे.

२०१७ मध्ये BMM Convention च्या निमित्ताने MMD मध्ये माझं पहिलं पाऊल पडलं. वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेली माणसं, वेगवेगळ्या भूमिका निभावणारे स्वयंसेवक आणि सगळ्यांच्या मनात एकच भावना — आपण सगळे मिळून काहीतरी सुंदर घडवत आहोत. त्या Convention मध्ये मी पहिल्यांदा मराठी माणसाची खरी ताकद अनुभवली — एकत्र येण्याची ताकद. प्रचंड धावपळ होती, थकवा होता, जबाबदाऱ्या होत्या... पण त्याचबरोबर एक वेगळीच ऊर्जा होती. आणि मग सुरू झाला माझा MMD चा प्रवास.

गेल्या काही वर्षांत MMD माझ्यासाठी केवळ एक संस्था राहिली नाही, तर ते माझं कुटुंब बनलं. कुटुंबाचा भाग असल्यासारखंच मी इथे प्रत्येक भावना अनुभवली आहे — आनंद, उत्साह, मजा, हशा, अभिमान... आणि हो, frustration, राग, थकवा, overwork आणि challenges देखील! कधी एखाद्या कार्यक्रमाच्या यशानंतर मिळालेल्या टाळ्यांनी मन भरून आलं, तर कधी पडद्यामागच्या एखाद्या छोट्याशा गोष्टीसाठी कितीतरी तास मेहनत घ्यावी लागली. कधी कौतुक मिळालं, तर कधी अडचणींनी संयम शिकवला. पण या सगळ्यापेक्षा मोठी गोष्ट मला मिळाली — ती म्हणजे माणसं. MMD मध्ये मला अनेक भूमिका निभावण्याची संधी मिळाली — Stage, Logistics, Programming, Photography आणि अनेक वेगवेगळ्या विभागांमध्ये काम केलं. आणि यावर्षी Vice President म्हणून जवळजवळ प्रत्येक department चा भाग होण्याचं भाग्य मला मिळालं. प्रत्येक department, प्रत्येक volunteer आणि प्रत्येक कार्यक्रमाने मला काहीतरी शिकवलं. मला स्वतःपेक्षा मोठ्या एका community चा भाग असल्याची जाणीव दिली. या प्रवासात माझ्या सोबत उभी राहिलेली आपली Captain Mansi Dahanukar. माझ्यावर विश्वास ठेवून मला तिच्या या प्रवासाची "better half" म्हणून निवडलं, ही माझ्यासाठी खूप खास गोष्ट आहे. Mansi मुळे हा प्रवास माझ्यासाठी आणखी सुंदर झाला. एक leader आपल्या सोबतच्या माणसांना देऊ शकतो अशा सगळ्यात मौल्यवान गोष्टी — वेळ, आदर आणि विश्वास — मला तीच्या कडून मिळाल्या. त्यामुळे हा प्रवास फक्त एक जबाबदारी न राहता, मनापासून enjoy केलेला एक सुंदर अनुभव बनला.



MMD च्या कार्यक्रमांमुळे weekends बदलले, वेळापत्रक बदललं, अचानक आलेल्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागल्या... पण माझ्या या प्रवासाचे दोन खास साथीदार — Abhijay आणि Ojas — या दोघांनीही हा प्रवास माझ्यासोबत अनुभवला आणि तितक्याच आनंदाने जगला. कदाचित या सगळ्या प्रवासामुळेच माझ्यातली थोडीशी वेडी, bindhaast Prajakta पुन्हा जागी झाली... आणि याच वर्षी मी Kilimanjaro hike करण्याचा एक "वेडा" निर्णय घेतला आणि आणखी एका भटकंतीच्या प्रवासाला सुरुवात केली. बाबांसोबत, वयाच्या ६८व्या वर्षी त्यांना माझ्यासोबत ५,७५६ मीटरपर्यंत चालताना पाहणं हा माझ्यासाठी आयुष्यातला एक अत्यंत प्रेरणादायी अनुभव होता. खरं तर या प्रवासाने मला एक नवीन goal दिलं — मला पुढे आयुष्यात कसं राहायचं आहे, किती active, किती curious आणि किती धाडसी राहायचं आहे, याची एक दिशा दिली. माझी आई, Aboli, Abhijay आणि Ojas यांनीही माझ्या या "crazy idea" ला तितक्याच आनंदाने साथ दिली.

Kilimanjaro वर चढताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली — मोठे पर्वत असोत किंवा आयुष्यातले मोठे टप्पे... शिखराकडे पाहत बसलो, तर ते अशक्य वाटतं. पण एकावेळी फक्त एक पाऊल टाकत राहिलं, तर आपण अपेक्षेपेक्षा कितीतरी पुढे जाऊ शकतो. त्या प्रवासाने मला माझ्याबद्दलही शिकवलं — थकवा आला तरी थांबायचं नाही, मार्ग कठीण झाला तरी पुढचं पाऊल टाकायचं... आणि कधी कधी स्वतःलाच surprise करण्यासाठी थोडं वेडं होऊन काहीतरी करून पाहायचं! कदाचित माझ्या MMD प्रवासातही हेच आहे. प्रत्येक नवीन जबाबदारी, प्रत्येक challenge आणि प्रत्येक नवीन कल्पना — एकेक पाऊल टाकत मी इथपर्यंत आले. आणि अजून खूप काही करायचं बाकी आहे.

**४९ Not Out का?**

"४९ Not Out" हा फक्त एक cricket score नाही. तो एक क्षण आहे — भावनेचा, कृतज्ञतेचा आणि आशेचा. Cricket मध्ये एखादा खेळाडू ४९ वर असतो, तेव्हा त्याने संघासाठी आधीच मोठं योगदान दिलेलं असतं. पण अजून एक run बाकी असतो. त्या एका run साठी सगळ्यांच्या नजरा खेळाडूकडे लागतात. Teammates, spectators, well-wishers — सगळे मनापासून वाट पाहत असतात त्या एका निर्णायक क्षणाची. कारण त्या एका run साठी फक्त खेळाडूची मेहनत पुरेशी नसते. त्याला लागतो संघाचा विश्वास, प्रेक्षकांचा उत्साह आणि सगळ्यांच्या शुभेच्छांचा हात.





आज Maharashtra Mandal of Detroit अगदी अशाच एका crease वर उभं आहे. गेली ४९ वर्षं, MMD ने संस्कृतीची, परंपरेची, आपलेपणाची आणि community ची एक सुंदर innings खेळली आहे. दूर परदेशात राहूनही महाराष्ट्राची माती, मराठी भाषा, आपली संस्कृती आणि आपली माणसं यांच्याशी नातं जपलं आहे. या innings मध्ये प्रत्येक volunteer चा, प्रत्येक family चा, प्रत्येक supporter चा, प्रत्येक sponsor चा आणि MMD वर प्रेम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सहभाग आहे. म्हणूनच हा ४९ फक्त आकडा नाही. हा आपल्या सगळ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचा score आहे. आता समोर आहे तो एक विशेष टप्पा — आपलं Golden Year.

जसं क्रिकेटमध्ये एका milestone नंतर खेळाडू पुन्हा पुढच्या धावांसाठी सज्ज होतो, तसंच MMD नेही पुढची अनेक वर्षं आणखी अर्थपूर्ण, समृद्ध आणि आपुलकीची innings खेळत राहावी. हा पुढचा run देखील आपण सगळे मिळून घेणार आहोत. तुमच्या आशीर्वादाने, प्रेमाने आणि सातत्यपूर्ण सहकार्याने आपण केवळ ५० पार करणार नाही...

तर MMD ची ही सुंदर innings पुढची अनेक वर्षं, अनेक पिढ्यांसाठी, तितक्याच प्रेमाने आणि अभिमानाने खेळत राहू.

भेटूया पुढच्या कार्यक्रमाला!

**उपाध्यक्षा**
**प्राजक्ता कुलकर्णी - काणे**

# गणपती: केवळ ईश्वर नव्हे, एक वैज्ञानिक व तात्विक रूपक!

घरच्या गणपतीचे दिवस जवळ यायला लागले की मनामध्ये आनंदाचे तरंग उमटू लागतात. विशेषतः अमेरिकेत राहताना हा आनंद अधिकच गडद आणि भावूक असतो. ऑगस्ट- सप्टेंबरची चाहूल लागली, की इथल्या धावपळीच्या आणि घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या आयुष्यात अचानक एका वेगळ्याच उत्साहाचा संचार होतो. "बाप्पा येणार!" ही एकच भावना मनात घर करते आणि महिनाभर आधीपासूनच स्थानिक मराठी मंडळाच्या (MMD) कार्यक्रमाच्या तयारीची लगबग सुरू होते. घरच्यासाठी दुकानांमधून मखराचे सामान शोधणे, पूजेच्या साहित्याची यादी करणे, उकडीच्या मोदकांसाठी तांदळाच्या पिठाची अन् खोबऱ्याची जमवाजमव... या सगळ्यात एक वेगळीच ओढ असते.



गेल्या वर्षी थेट महाराष्ट्रातल्या आपल्या मूळ घरी जाऊन मुलांना गणेशोत्सवाचा मूळ आनंद घेता यावा म्हणून सहकुटुंब भारत दौरा केला होता. घराघरात आरतीचे घुमणारे सूर आणि धूप, कापूर, वेलदोडा मिश्रित ओल्या नारळाच्या सारणाचा व तांदळाच्या उकडीचा तो ओळखीचा सुवास! आपल्या माणसांना एकत्र आणणारा, ताण विसरायला लावणारा आणि अंतर्मनात एक असीम शांतता भरून देणारा हा उत्सव आम्ही प्रत्यक्ष पुन्हा एकदा अनुभवत होतो.

पण गणेशोत्सवाची सांगता झाली की बाप्पाला निरोप देताना मन काहीसे विषण्ण होते. गेल्या वर्षी माझ्या अमेरिकन शेजाऱ्याने मला सहज विचारले, "Abhi, why you worship an elephant god so lovingly for 10 days and then drown him in the end?" मी क्षणभर गडबडलो. त्याला काय सांगू? की आम्ही बुद्धीच्या देवतेची पूजा करतो, पण त्याच सणात बुद्धीलाच विसर्जित करतो, हे सांगू? त्यातून गल्लीबोळातून अचकट-विचकट नाच करत, मोठमोठाल्ले ध्वनिवर्धक लावून, ५०-५० ढोलताशे "बडवून" सार्वजनिक विसर्जन मिरवणूक काढणारे भक्त बघून आणि विसर्जन केल्यानंतर मूर्तींची होणारी हेळसांड बघून मन अधिकच उद्विग्न होते.

असाच हताश होऊन (ओल्या नारळाचे गरमागरम १०-१२ मोदक आणि वरून तुपाची धार रिचवून) मी डोळे मिटून बसलेलो असताना मनात प्रश्नांच्या असंख्य माशा घोंगावत होत्या. आपण नक्की विसर्जन का करतो? गणेशजन्म माघ चतुर्थीला, मग हा उत्सव भाद्रपद चतुर्थीला का? आणि हे दीड, पाच, सात, दहा दिवसांच्या उत्सवाचे नक्की काय प्रयोजन? आणि गणपती त्या आचरट भक्तांच्या मुंड्या सोंडेने खरंच पिरगाळून का नाही टाकत? गणपतीला हत्तीची डोकं, माणसाचं शरीर असं transplant खरंच असेल? तुंदिलतनु गणराया उंदरावर स्वार कसा होत असेल असं नुसतं विचारांचं मोहोळ उठलं होतं.
त्याच तंद्रीत एक विलक्षण अनुभव आला. साक्षात विद्यापती माझ्यासमोर अवतरले! त्यांच्याबरोबर ज्यांनी गणेशोत्सवाची मूळ संकल्पना मांडली ते विचारवंत-ऋषी समोर प्रकट झाले आणि त्यांची 'थॉट प्रोसेस' सांगू लागले...त्यांनी मातीपासून गणेशजन्माची कथा, दीड ते दहा दिवस दूध-दही-पंचामृताचा अभिषेक आणि तलावातून (नदी किंवा विहिरीतून नाही) परतीच्या प्रवासाचा थेट शेतातल्या पिकाशी असलेला संबंध अलगद उलगडून सांगितला...

## निसर्गचक्र, शेती आणि 'जिवामृत'

ऋषी सांगत होते...श्रावण संपता संपता भातलावणी पूर्ण होऊन बळीराजा जरा निवांत झालेला असतो. भाद्रपदात हस्त नक्षत्राच्या पावसाने भाताची खळी पूर्ण भरलेली असतात. या काळात सशक्त पिकासाठी, म्हणजेच भाताची 'पोटरी' भरण्यासाठी (Tillering stage) उत्तम खताची गरज असते.

या पोटरीला मदत करणारा मुख्य घटक म्हणजे लॅक्टोबेसिलस जिवाणू (Lactobacillus spp. like Lactobacillus plantarum, Lactobacillus casei, etc. are plant growth-promoting rhizobacteria (PGPR)). हा जिवाणू दही-दुधात उदंड असतो. मग शेतातल्या निराकार मातीतून गजानन रूपात गणेशमूर्ती साकारून त्यावर दही-दुधाचा

अभिषेक केला आणि रोजच्या ओलाव्याने लॅक्टोबेसिलस जिवाणूंच्या भरघोस कॉलनीज (Colonies) बनवल्या, तर? कोकणासारख्या आर्द्र (Humid) प्रदेशात ही वाढ व्हायला १-२ दिवस, तर मराठवाड्यासारख्या कोरड्या हवामानात ७-८ दिवस पुरेसे आहेत! यामागे हवामानाचे शास्त्र असावे, कोकणस्थ-देशस्थ स्वभावविशेषांचा यात काडीमात्र संबंध नाही. ही मूर्ती जेव्हा गावाच्या वरच्या अंगाला असलेल्या तलावात नेऊन सोडली जाते, तर घराघरातून जिवामृताने (बॅक्टेरिया अमृताने) परिपूर्ण झालेले हे पाणी गावाच्या सर्व खळ्यांना अन् शिवाराला मिळेल! शेतातल्या निवांतपणात, भाताच्या पोट्या भरण्याच्या आनंदात वाजत-गाजत, नाचत-गात या जिवामृताने भरलेल्या विघ्नहर्त्याचे विसर्जन करून सुगीच्या दिवसांचा 'श्रीगणेशा' करणे, हा या उत्सवाचा मूळ विचार होता!

**रूपके, विज्ञान आणि तात्विक मंथन**

ते प्रकाशमान महर्षी गणपतीच्या सगळ्या रूपकांचे जरा विचारपूर्वक विश्लेषण करायला सांगत अंतर्धान पावले. माझे असंख्य प्रश्न तर अजूनही अनुत्तरित होते. या ब्रह्मानंदी टाळीमध्ये माझाच माझ्याशी झालेला संवाद पुढे असा उलगडत गेला. तुम्हाला पटल्यास पुढच्या पिढीला नक्की कळवा नाहीतर बाप्पा बरोबर विसर्जन करून टाका.

**अंगाचा मळ नि शिरच्छेद:** पार्वतीने अंगाच्या मळापासून बालकाची निर्मिती करून त्यात प्राण फुंकले, तर मग शिवाने शिरच्छेद केल्यावर परत अंगाच्या मळातून तिने शिर का बनवले नाही? अंगाचा मळ हे मानवी अहंकार आणि नश्वर भौतिक शरीराचे प्रतीक (Mundane state) आहे. शिवाने म्हणजेच त्या परब्रह्माने भौतिक अहंकाराचा त्रिशुळाच्या एकाच आघातात छेद केला. पार्वतीने पुन्हा मळाचे शिर जोडले असते, तर तो अहंकाराचा पुनरुच्चार ठरला असता. शिवाने तिथे ज्ञानाचे प्रतीक असणारे 'गजानन' रूप जोडले; अर्थात भौतिक जन्मापेक्षा 'ज्ञानाचा जन्म' श्रेष्ठ आहे!

**हिमालयातील हत्ती नि वातावरणशास्त्र:** गिरिजात्मजाचा जन्म हिमालयात झाला असे मानले, तर गणांना पहिला प्राणी हत्ती कसा दिसला? आज हिमालयात हत्ती दुर्मिळ आहेत. परंतु, भूगर्भशास्त्र (Paleontology) सांगते की, हजारो वर्षांपूर्वी हिमालय तरुण असताना शिवालिक पर्वतरांगांमध्ये 'स्टेगोडॉन'सारख्या प्रागैतिहासिक हत्तींचा मुबलक वावर होता. तसेच, वैद्यकीय दृष्टीने विचार केल्यास, गंभीर दुखापतीनंतर श्वसननलिका मोकळी करण्यासाठी लावलेली ऑक्सिजनची नळी किंवा मास्क पाहून सामान्य लोकांनी त्याचे वर्णन सोंडेशी जोडले असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. सुश्रुत ४००० वर्षांपूर्वी नाकाची, त्वचेची Rhinoplasty करतच होते की!

**हिमालयातील नारळ अन मोदक?:** हिमालयात नारळ येत नाहीत; परंतु तांदूळ आणि गूळ ही भारतातील जुनी अन्ने आहेत. प्राचीन व्यापारी मार्गांद्वारे नारळ उत्तरेकडे पोहोचला. पुढे जेव्हा गणेशपूजा कोकणात रुजली, तेव्हा स्थानिक पातळीवर नारळ उपलब्ध असल्यामुळे आणि कोणा एकाला/जनसामान्याला ओल्याखोबऱ्याचे मोदक आवडत असल्यामुळे, स्वतःच्या इच्छापूर्तीसाठी किंवा खाद्यसंस्कृतीच्या प्रेमापोटी "गणपतीला मोदक आवडतात" हे पसरवले गेले असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यातूनच मग "गणपतीला मोदक आवडतात" ही परंपरा दृढ झाली असावी.

**मूषक वाहन:** प्रागैतिहासिक Megafauna काळात (१२-१५ हजार वर्षांपूर्वी ते १ कोटीवर्षांपूर्वी ) उंदरांच्या विशाल प्रजाती असणे शक्य आहे. प्राचीन काळी म्हणजे वाघ, हत्ती, मासे, पाली आजच्यापेक्षा १०-१२ पट मोठे होते, तर उंदीरसुद्धा मोठे असणे शक्य आहे आणि त्यापैकी एकाला गणपतीने वाहन बनवले असेल? तात्विकदृष्ट्या, उंदीर हा अंधारात गुप्तपणे अडथळे निर्माण करणाऱ्या चंचल मनाचे प्रतीक मानला जातो. जो या चंचल मनावर विजय मिळवून त्याला नियंत्रित करतो, तोच खरा बुद्धीमान! उंदीर खरोखरच एवढा मोठा होता की आपले मनच इतके चंचल झाले आहे की त्याला आवरण्यासाठी हत्तीएवढी बुद्धी लागते?

गणपतीचा कालखंड नक्की कधीचा? गणपतीने महाभारत लिहिले असे मानले जाते, म्हणजेच महाभारत घडले त्या ५,००० ते ६,००० वर्षांपूर्वी गणपतीचे अस्तित्व असले पाहिजे, ऋग्वेदामध्ये "गणानां त्वा गणपतिं हवामहे" असा उल्लेख येतो. मानवी

इतिहासात जेव्हा टोळ्या (Ganas) तयार झाल्या, तेव्हा त्या समूहाच्या प्रमुखाला 'गणपती' म्हटले गेले आहे. हा संदर्भ खरा मानला तर गणपती निदान ३००० वर्षांपूर्वीचा. पण fossils, megafauna आणि Paleontology चा संदर्भ खरा मानला तर हि अधिदेवता त्याहून कित्येक लाखो-करोडो वर्षे आधीची? माघ चतुर्थीला त्याचा जन्म साजरा केला जातो; वर्षाची नोंद उपलब्ध नसली तरी या संकल्पनेचा प्रवास वैदिक काळापासून सुरु होतो. भाद्रपद चतुर्थीला, भातलागवडीनंतर गणपती भूतलावर काही दिवसांसाठी येतो आणि भातशेतीला भरभराटीचा आशीर्वाद देऊन अनंतचतुर्दशीला भक्तांच्या उत्साही मिरवणुकीत परत जातो. तेव्हा ऋषी, तलावात जिवामृत सोडत होते, आज आपण प्लास्टर आणि केमिकल रंग सोडतो. तेव्हा आरतीने पिके बहरायची, आज डीजेने कान फुटतात. याला प्रगती म्हणायची की अधोगती?

माझी अशी ब्रह्मानंदी टाळी लागलेली असताना असताना खिडकीच्या काचा अचानक खडखड वाजू लागल्या? भूकंप येतोय की काय? मी बाहेर बघितले आणि क्षणार्धात भूतलावर, वर्तमानात आलो. “ब्रह्मानंदी टाळी लागली | मग देहाते कोण सांभाळी ||” याचे उत्तर भूतलावरील चौकातल्या एका गणेश मित्र मंडळाने दिले होते.

खिडकीबाहेर डोकावून बघितले तर विसर्जन रांगेतील मानाचे शेवटचे मंडळ, ११व्या दिवशी (१०व्या नाही) दुपारी १२ वाजता लाऊडस्पीकर्सची, चीनच्या भिंतीला लाजवेल अशी Plasma wall घेऊन, सूर्यकोटी ब्रह्मांडनायकावर lasers टाकून, पायात तुटक्या slippers घालून, शर्टची बटणं तोडून, शर्ट फाडून बाहेर डोकावणारी ढेरी सावरत 'चिकनी चमेली'वर दात ओठ खाऊन, जीभ लवलवत काही मुक्तगण (भक्तगण नाही) नृत्यसेवा करत होते आणि बाप्पाला पुढच्या वर्षी लवकर यायचं आमंत्रण देत होतं. एकंदर बाहेरचा नजारा बघून हा उत्सव आहे की बुद्धीचा लिलाव असा प्रश्न पडला होता. ज्याने कोणी गणेश विसर्जनाला जाताना गणेशमूर्तीचे डोळे बांधण्याची (आणि कोणीतरी कान पण झाका रे माझ्या बाप्पाचे!) प्रथा चालू केली, त्याचे शतशः आभार मानून मी परत डोळे मिटून घेतले! 🙏

**अंतिम विचार:** कोणाच्याही धार्मिक भावना न दुखवता किंवा दुखावून न घेता, पुढच्या पिढीला, विशेषतः परदेशात वाढणाऱ्या मुलांना आपल्या देवतांबद्दल समाधानकारक आणि logical उत्तरे देता यावीत, हाच यामागचा उद्देश आहे.

आपल्या पूर्वजांनी विज्ञान, शेती आणि तत्वज्ञान यांना कथा-रुपात गुंफून सण घडवले, जेणेकरुन सामान्य माणूस निसर्गापासून तुटू नये. आपण मात्र काळाच्या ओघात त्या कथांमागचे 'शास्त्र' विसरलो आणि केवळ कर्मकांडाला आणि आता तर डीजे-लेझरच्या विकृतीला धर्म मानू लागलो. पौराणिक कथांमागील रुपके, निसर्गविज्ञान आणि इतिहास, वैज्ञानिक चौकटीत मांडू शकलो, तरच सत्य आणि शास्त्रीयकथन पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवल्याचा खरा आनंद मिळेल!

जेन-अल्फाला नुसत्या कथा सांगून चालणार नाही. त्यांना ही Listen, Observe and Learn वाली बुद्धीची देवता वेगवेगळ्या पैलूंनी उलगडून दाखवावी लागेल, अहंकार-विनाशाचे तत्वज्ञान सांगावे लागेल. त्यांना विवेकवादी दृष्टी दिली तरच ते अभिमानाने म्हणतील, आमचा बाप्पा खरंच बुद्धीची देवता आहे.

या मंथनामामुळे मी आता अमेरिकेत आपल्या मुलांना आणि माझ्या त्या अमेरिकन शेजाऱ्याला नक्की उत्तर देऊ शकेन. गणपती बाप्पा मोरया!

**– अभिजित जोगदेव**
**Principal & BMM Shala Coordinator**
**MMD Canton Marathi Shala, Detroit MI, USA**
**September 05, 2026**



# Best Wishes
# from
# Prabhakar Patil & Family

## मनीषा डोंगरे: नाचे मयुरी

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नायिकेच्या प्रकृतीनुसार तीन आणि परिस्थितीनुसार (situation/condition) आठ - अष्टनायिका - असे प्रकार आहेत. त्या सर्व नायिका समरसून रंगमंचावर साकार करणारी आमची मैत्रीण म्हणजे मनीषा डोंगरे!

तिला शाळेपासून नाटक व नृत्य या कलांची आवडच नाही तर वेड होते. खरं तर शिक्षणाने ती इलेक्ट्रिकल इंजिनिअर होती आणि त्या क्षेत्रात तिने नोकरी देखील केली पण संधी मिळताच तनमनधन अर्पून ती कथकसाधनेकडे वळली. 'हुस्न-ए-ख़याल और अंदाज़-ए-बयान' असं उर्दू शायरीबद्दल म्हणतात. ते वर्णन तिच्या नृत्याला लागू पडतं - विचारांची सुंदरता आणि सादरीकरणातली शोभा हे तिचे वैशिष्ट्य होते.

एकदा मी तिला सहज एका नाट्यसंगीताबद्दल सांगत होते, "दूती नसे ही माला, सवतची भासे मला." तिने लगेच सरदारी बेगम मध्ये एक सुंदर ठुमरी आहे, ती बसून अदाकारी दाखवत कथकरूपाने सादर करतात ते उदाहरण दिले. हाताने पोपटाची मुद्रा केली आणि म्हणाली, "पापी पपीहा हमरे बैरी,लेत पिया का नाम' ओळ तशीच आहे बघ. माझ्या प्रियकराचं नाव घ्यायचं या पोपटाला स्वातंत्र्य आहे पण मला नाही आणि ते नाव घेऊन नुसता मला छळतोय.." असं म्हणत ते गाणं गुणगुणत तिने मला अभिनय करून दाखवला.





ही सहजता तिच्या वागण्यातही होती. ओळख झाली की पटकन 'या ना आमच्या घरी जेवायला' असं आमंत्रण तिच्या तोंडून मनापासून जायचं. मिश्किल स्वभाव आणि घराचे व मनाचे दार उघडलेले यामुळे तिची व आमची मैत्री झाली आणि आणि ती वर्षानुवर्षे दृढ होत गेली.

तिच्या आजाराला सुरुवात झाली (असावी) ती कानापासून. तिला ऐकू कमी यायचं पण ती ते हसण्यावारी न्यायची. एकदा म्हणाली अगं, 'एक तर मला ऐकायला येत नाही आणि ऐकू आलं तरी कळत नाही. मुलं बोलायला येतात, माझ्या बावळट चेहऱ्याकडे बघतात आणि 'never mind' म्हणून निघून जातात.' हे ऐकणारे लगेच खो खो हसले! ती हजरजबाबी आणि अगदी charming होती !

उल्का तिच्या घरी क्लासला गेली की म्हणायची "घड्याळ लावायला हवे, उल्का आली" कारण ती सकाळी ९ च्या ठोक्याला (किंवा बऱ्याचदा ८ वाजता !) तिच्या क्लासला हजर असे !! तिला शिकवताना काहीतरी जोक आठवायचा व हसू यायचं, मग "उल्का..." असं ओरडत स्वतःच हसायची. तिला बऱ्याचदा गाणं (for the dance!) म्हणायला लावायची तसेच तिचे शब्द "उल्का baby, ding dong, o baby sing a song" अजूनही आठवून मनातल्या मनात हसू येतं...

हे आणि असे तिच्या नर्मविनोदी स्वभावाचे अनेक किस्से आहेत पण आजची मानवंदना 'मनीषा डोंगरे' या नृत्यांगनेला आहे. उल्काकडून, तिच्या विद्यार्थिनीच्या भूमिकेतून...

आमची ओळख २००७ पासून झाली. It was a fan moment for me!! मंडळाच्या कोजागिरीच्या कार्यक्रमाचे ती निवेदन करत होती. मला तेव्हा कळले की ती जितके सुंदर निवेदन आणि एकपात्री नाट्य प्रयोग करते (तिने सादर केलेला "ती फुलराणी" मधला प्रवेश मी कधीच विसरू शकत नाही!) तितकेच सुंदर कथक पण करते! मग काय...मी लगेच तिला विचारले 'मला कथक शिकवशील का'? तिने लगेच 'हो' म्हटले आणि तिच्या Arthur drive च्या घरात माझी तालीम सुरू झाली. तिला इथे आणि जवळपासच्या शहरांत कथकसारख्या एका शास्त्रीय नृत्याची गोडी निर्माण करायला व तो लोकांपर्यंत पोहोचवायला सुरुवातीला खूप कष्ट घ्यावे लागले. बॉलीवूडमधली रागदारीवर आधारित गाणी, जोगवा, गोंधळ व लावणी सारखी लोकनृत्य तसेच इतरही काही compositions वर तिने कथकचा आधार घेऊन नृत्य बसवले आणि 'ताल अकॅडेमी'चे नाव लोकांसमोर आणले. मला तिच्या अनेक कार्यक्रमात सहभागी व्हायची संधी मिळाली. I found her creative approach to any choreography backed by a solid knowledge of literature very appealing.




काही ठराविक सण आले की ती आवर्जून त्याला योग्य अशी रचना शिकवत असे. एकदा नवरात्रीत तिने 'देवी कवित्त' तिच्या सुंदर हस्ताक्षरात लिहून आम्हाला शिकवले होते आणि तेव्हा तिचा चेहरा अगदी बघत रहावा असा तेजस्वी व्हायचा देवीसारखा. तिच्या ठायी असलेली भक्ती (देवाप्रती आणि कलेवरची) तिच्या अभिनयात जाणवायची. किंबहुना तो मनापासून केलेला अभिनय सात्विक, स्वाभाविक आणि लोकधर्मी स्वरुपाचा असायचा.

काळ व जागेच्या मर्यादा सांभाळून ती, कथकचा धागा न सोडता, नाच निवडत व बसवत असे. कधी 'सोहम हर डमरू' सारखे भजन तर कधी "सैंय्या" ही सुफी अंगाने जाणारी रचना, इतकंच काय तर कधी Beyonce च्या इंग्लिश गाण्यावरही तिने कथक बसवल्याचे आठवते. नाच बसवताना गाण्यातल्या व्यक्तिरेखांचा सखोल विचार करून मगच पुढची तयारी. काही व्यक्तिरेखांवर तिचे विलक्षण प्रेम होते; झाशीची राणी आणि संत मीराबाई. कदाचित त्यांच्याकडूनच तिला जगण्याची व लढण्याची प्रेरणा मिळाली असावी.

संत मीराबाई हे व्यक्तिमत्व आणि तिच्या कृष्णावर प्रेमाच्या वेगवेगळ्या छटा हा तिच्या जिव्हाळ्याचा विषय होता - नृत्यातून सादर करायला. तिने 'ऐसी लागी लगन' हे नृत्यनाट्य बसवून डेट्रॉईट व बाहेरगावी अनेक प्रयोग केले होते. त्याचबरोबर "शतरंगिणी", "सन्निधी", "रिवायत", "नृत्यानुभूती" हे कार्यक्रम आठवत असतीलच, योग्य गाणी, अभिनव नृत्यरचना आणि ज्योत्स्नाच्या मदतीने सुंदर निवेदन गुंफल्याने ते प्रेक्षकांना खूप भावले होते.



ती खूप प्रयोगशील होती. तिच्या creativity चा झरा अखंड वाहत असे कारण त्याला साहित्याची भक्कम जोड होती. नृत्य हा तिचा स्थायीभाव होता, त्याच भावनेने ती इतर शास्त्रीय नृत्यांबरोबर जोडली गेली. "मैत्री" हा ५ मैत्रिणींनी (ज्या कथक, भरतनाट्यम, कुचिपुडी, मोहिनीअट्टम, आणि ओडिसी मध्ये कार्यरत आहेत) एकत्र येऊन एक सुंदर initiative घेतला, एकमेकांच्या कलांचा सन्मान करायला व प्रत्येकातली सुंदरता व वैशिष्ट्ये जाणून ती प्रेक्षकापर्यंत पोहोचवायला. त्यांचे productions अतिशय creative असत आणि त्यांचे brainstorming sessions म्हणजे "हसून हसून पुरेवाट" असे सांगायची मनिषा!! 'मैत्री'ने एकदा यमुना नदीच्या मनोगतावर "साक्षी" नावाची नृत्यकथा सादर केली होती तर एकदा Oakland University च्या वाद्यवृंदाच्या साथीवर नृत्य केले होते.

खरं म्हणजे मनीषाची तब्येत जेव्हा खालावली तेव्हाही तिच्या शरीरात कथक हाच एक श्वास होता आणि सच्च्या कलाकाराची जिज्ञासा जिवंत होती. मी एकदा तिला भेटायला गेले तेव्हा "श्रीमंत योगी" ह्या डेट्रॉईटच्या कलावंतांनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगाबद्दल बोलणे झाले. तिला ह्या कल्पनेमागचा विचार, तो सादर कसा केला, व त्यात कुठले प्रसंग कसे मांडले हे जाणून घ्यायची खूप उत्सुकता होती! तिचे जरी बोलणे कमी झाले तरी डोळे खूप बोलायचे तेव्हा माझी शिष्य म्हणून खरी परीक्षा होती...पण तिचे डोळे हा तिचा मनाचा आरसा होता म्हणून बऱ्याचदा त्यानेच कळायचे तिला काय सांगायचे आहे...

तिला मी बरेच प्रश्न विचारायचे कथकबाबतीत ..आणि ती त्याची उत्तरं द्यायची देखील. पण काहींची उत्तरं तिने मुद्दाम नाही दिली. आता जवळ जवळ १३ वर्ष झाल्यावर, जेव्हा मी कथक शिकवायला लागले तेव्हा ती उत्तरं सापडली - बहुतेक तिला हीच जाणीव करून द्यायची असेल की काही प्रश्न योग्य वेळ आली की मगच सुटतात आणि ती अनुभव व योग्य साधनेनंतर शिष्यानेच शोधायची असतात. गेल्या वर्षी मैत्री द्वारा "अमर नृत्यकथा" सादर झाले तेव्हा आमची अमर सखी, माझी गुरु तर कधी माझी मोठी बहीण...ह्या जगात नव्हती पण तिचे आशीर्वाद आमच्या पाठीशी नेहेमी असतात आणि सतत ऊर्जा देत असतात. "नृत्यं एवं जगत्" हे खऱ्या अर्थाने जगणारी आमची मनिषा तोच बीजमंत्र देऊन गेली जो जपण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करत राहू.

**उल्का भिडे**
**ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**

# GKR and Associates, P.C.

Tax and Accounting Firm

Raj Grewal, CPA



**OUR SERVICES:**

- Tax and Accounting for individuals and small businesses

info@gkrcpa.com

734-658-8334

https://www.gkrcpa.com

Partner with us to create additional income and build wealth

We are expanding our team, call us to find out more!



**Best Wishes from Pradeep Kokate & Sharayu Dalvi**

महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट लवकरच सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करणार आहे . या निमित्ताने, ज्यांनी हे मंडळ स्थापन केले, वाढवले, वृद्धिंगत केले अश्या अनेक सभासंदांची मुलाखत घेण्याचे या वर्षी स्नेहबंध समिती ने ठरवले आहे, "आठवणींच्या हिंदोळ्यात " या सदरातून . मंडळाचे सभासद **श्री शिरीष भिडे** यांनी आपले ज्येष्ठ सभासद " **श्री सुभाष केळकर** " यांची मुलाखत घेतली आहे . मुलाखत वाचून आपला अभिप्राय जरूर द्या ...........

**१) आपण भारतातून डेट्रॉईट परिसरात कधी आणि कोणत्या कारणासाठी स्थलांतर केले?**
मी भारतातून थेट Detroit मध्ये आलो नाही. १९६७ ते १९७३ या काळात मी University of Missouri-Rolla मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत होतो. Mechanical Engineering मध्ये पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर, जुलै १९७३ मध्ये मी Detroit मधील Burroughs Corp मध्ये नोकरीला लागलो आणि तेव्हापासून Detroit मध्येच राहतो आहे.

**२) अमेरिकेत आल्यावर सुरुवातीच्या काळात कोणत्या अडचणी सर्वाधिक जाणवल्या?**
अडचणी म्हणल्यातर बहुसंख्य इतर भारतीय विद्यार्थ्यांप्रमाणेच: Dollars ची कमतरता, घराची आठवण, भविष्याबद्दल अनिश्चितता, ग्रीन कार्ड नाही, इत्यादी.

**३) MMD संस्था स्थापन करण्यामागील मुख्य उद्देश काय होता? सुरुवातीच्या काळातील संस्थेच्या काही आठवणी किंवा अनुभव सांगाल का?**
मी MMD च्या स्थापनेत सहभागी झालो नव्हतो, पण स्थापना झाल्यानंतर मी लगेच MMD मध्ये सामील झालो. मंडळाच्या स्थापनेमागचा उद्देश सांगण्यासाठी अधिक योग्य व्यक्ती म्हणजे अशोक देशपांडे किंवा श्रीमती सरदेशपांडे.

४) **MMD समितीचे सदस्य म्हणून काम करतानाच्या काही आठवणी आणि अनुभव तसेच MMD च्या आणि इतर कार्यक्रमांमध्ये यशस्वीरीत्या सादर केलेल्या विविध मराठी नाटकांचे दिग्दर्शक म्हणून काम करतानाच्या काही आठवणी सांगा.**
मी MMD च्या कार्यकारिणीवर काही वेळा विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत; पण कधीही अध्यक्ष म्हणून नाही. स्थानिक मराठी रंगभूमीशी माझा संबंध कसा जुळला आणि पुढे मी नाटके दिग्दर्शित करण्यापर्यंत कसा पोहोचलो, यामागे घटनांची एक विलक्षण साखळी आहे—किंवा, निव्वळ योगायोग! असेही म्हणता येईल. University of Missouri-Rolla च्या campus वर असताना मी हिंदी चित्रपटसंगीताचा एक रेडिओ कार्यक्रम सुरू केला होता. १९७१ ते १९७३ या काळात मी तेथे रेडिओ जॉकी म्हणूनही काम केले. April १९७७ मध्ये डेट्रॉइटला आल्यानंतर मी हीच आवड पुन्हा जोपासण्यास सुरुवात केली. April २०२७ मध्ये Detroit मधील माझ्या 'गीतांजली' या रेडिओ कार्यक्रमाला तब्बल ५० वर्षे पूर्ण होतील. १९६० आणि १९७० च्या दशकात America मध्ये भारतीय किराणा मालाची दुकाने अत्यंत कमी होती. Detroit च्या downtown भागात फक्त एकच भारतीय दुकान होते. त्यामुळे किराणामालाच्या खरेदीसाठी आम्हाला अनेकदा Windsor, Toronto किंवा Chicago पर्यंत जावे लागे. अगदी कोथिंबिरीसारखी साधी गोष्टही त्या काळी American किराणा दुकानांत मिळत नसे. कोथिंबीर विकत घेण्यासाठी आम्हाला Southland मधील Curly's नावाच्या फळांच्या बाजारात किंवा Troy मधील एका फळबाजारात गाडीने जावे लागे. अशाच एके वेळी, Curly's मध्ये आम्हाला एक जोडपे मराठीत बोलताना ऐकू आले. आम्ही त्यांच्या जवळ गेलो आणि स्वतःची ओळख करून दिली. अशा प्रकारे आमची पानसे दांपत्याशी ओळख झाली. त्या क्षणी अर्थातच आम्हाला कल्पना नव्हती की ही साधीशी ओळख पुढे माझ्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या प्रवासाची सुरुवात ठरेल. डॉ. श्रीरंग लेले हे अत्यंत प्रतिभावान नाट्यदिग्दर्शक होते. त्यांनी १९७८ मध्ये डेट्रॉइटमध्ये मराठी नाटके दिग्दर्शित करण्यास सुरुवात केली. त्यांनी दिग्दर्शित केलेली पहिली दोन नाटके म्हणजे 'आमलदार' आणि 'लग्नाची बेडी'. डॉ. लेले स्वतःही उत्कृष्ट अभिनेते होते आणि या दोन्ही नाटकांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. त्या काळात नाटकांमध्ये सरदेशपांडे दांपत्य, पानसे दांपत्य आणि शरयू दळवी यांचाही सहभाग होता. मात्र, त्या वेळी नाटकात प्रत्यक्ष भाग घेण्यापासून मी मैलोनमैल दूर होतो! स्थानिक पातळीवर सादर होणारी सर्व नाटके मी आवर्जून पाहत असे, पण रंगमंचावर उभे राहण्याचा विचारही माझ्या

मनात नव्हता. १९८१ मध्ये डॉ. लेले डेट्रॉइट सोडून गेले. त्या वेळी ते 'झोपी गेलेला जागा झाला' या नाटकाचे दिग्दर्शन करत होते. त्यांच्या जाण्यानंतर त्या नाटकातीलच एक कलाकार, डॉ. सुरेश गाडगीळ यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली. या नाटकात 'दिल-ए-जलाल' नावाचे एक प्रमुख पात्र होते आणि ते पात्र केवळ उर्दूमध्ये बोलत असे. स्थानिक नाट्यसंघाला अस्खलित उर्दू बोलू शकणारी व्यक्ती सापडत नव्हती. शकु पानसे या त्या नाटकात काम करत होत्या. त्यांनी माझ्या रेडिओ कार्यक्रमातून माझे उर्दू उच्चार आणि शब्दोच्चार ऐकले होते. त्यामुळे त्यांनी दिग्दर्शकाला या भूमिकेसाठी माझा विचार करण्याची सूचना केली. सुरुवातीला मी खूपच साशंक होतो आणि नाटकात काम करण्यास तयार नव्हतो. मात्र, शेवटी मी होकार दिला आणि अभिनेता म्हणून सहभागी झालो. अशा रीतीने, ज्या रंगभूमीकडे मी आतापर्यंत केवळ प्रेक्षक म्हणून पाहत होतो, त्याच रंगभूमीवर मी प्रथमच कलाकार म्हणून पाऊल ठेवले. १९८३ मध्ये डॉ. सुरेश गाडगीळ नॅशव्हिलला गेले. त्यानंतर त्याच वर्षी डेट्रॉइटमध्ये माझ्या पहिल्या नाटकाचे—'छूमंतर'चे—दिग्दर्शन करण्याची संधी मला मिळाली. तिथून सुरू झालेला नाट्यप्रवास पुढे एका दीर्घ मालिकेत रूपांतरित झाला आणि तो प्रवास आजही सुरू आहे. मागे वळून पाहताना या सगळ्या प्रवासाची सुरुवात किती साध्या घटनेपासून झाली होती, याचेच आश्चर्य वाटते. Curly's मध्ये एक कोथिंबिरीची एक जुडी विकत घेण्यासाठी गेलो, तिथे मराठीत बोलणारे पानसे दांपत्य भेटले, आणि त्या ओळखीच्या धाग्यानी पुढे मला डेट्रॉइटच्या मराठी रंगभूमीशी जोडले. योगायोगच नाही का ?

### ५) गेल्या ४०–५० वर्षांत संस्थेमध्ये झालेले सर्वात मोठे बदल कोणते वाटतात?

गेल्या ५० वर्षांत MMD चा आकार खूप वाढला आहे आणि त्यामुळे आपले कामकाजाचे बजेटही खूप मोठे झाले आहे. साधारण २००९ पर्यंत MMD अतिशय कमी बजेटमध्ये काम करत होती, कारण तोपर्यंत MMD ने sponsors मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले नव्हते. बजेट वाढल्यानंतर आपल्याला भारतातील अनेक चांगली नाटके पाहायला मिळाली, जसे की 'शिकायला गेलो एक' आणि 'वाडा चिरेबंदी'. 'कुर्रर्र' सारखी काही नाटके तितकी चांगली नव्हती. MMD च्या कार्यक्रमांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा खूप विचार केला जातो, ही खरोखरच प्रशंसनीय गोष्ट आहे.

### ६) सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरुप, नियोजन आणि सादरीकरण कसे बदलले आहे?

सर्वात मोठा बदल म्हणजे भारतातून येणाऱ्या व्यावसायिक नाटकांची मोठी संख्या. यांपैकी काही नाटके खरोखरच उत्कृष्ट आहेत, पण काही मात्र खूप निराशाजनक आहेत. दुर्दैवाने, भारतातून इतकी व्यावसायिक नाटके उपलब्ध होत असल्यामुळे स्थानिक कलाकारांना आपली प्रतिभा दाखवण्याच्या संधी कमी झाल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत एकही स्थानिक नाटक झालेले नाही, आणि ही खरोखरच दुःखाची गोष्ट आहे!

### ७) कार्यक्रमांमधील जेवण, खाद्यसंस्कृती आणि एकत्र येण्याची पद्धत कशी बदलली आहे?

जेवणाच्या दर्जात झालेले बदल हे सर्व चांगल्यासाठीच झाले आहेत. १९७० आणि १९८० च्या दशकात जेवण वेगवेगळ्या लोकांच्या घरी बनवले जात असे, त्यामुळे चव आणि दर्जा एकसारखा नसे. MMD ने फक्त केटरिंगचे जेवण देण्यास सुरुवात केल्यापासून जेवणाचा दर्जा खूपच सुधारला आहे.

### ८) नव्या पिढीचा मराठी भाषा व संस्कृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा वाटतो?

आमच्या पिढीला मंडळाची जितकी गरज होती, तितकी आजच्या तरुण पिढीला वाटत नाही. भारतात असलेल्या आपल्या प्रियजनांशी आता सहज संपर्क साधता येतो आणि भारतीय टीव्ही कार्यक्रम तसेच मराठी चित्रपटही सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या तरुण पिढीला स्थानिक मराठी समुदायाचा भाग असण्याची तितकी गरज वाटत नाही.

भारतातून आलेली एखादी तरुण नववधू दररोज भारतातील आपल्या आईला video call करून पाककृती विचारू शकते किंवा इतर बाबतीत सल्ला घेऊ शकते. दहा किंवा त्याहून अधिक भारतीय कुटुंबांचा एक गट मोठ्या महाराष्ट्रीयन समुदायाशी संपर्क न ठेवताही आपापल्या गरजा आपल्यातच भागवू शकतो. मला वाटते की MMD साठी हा एक मोठा तोटा आहे.

**९) मराठी भाषा आणि संस्कृती जपण्यासाठी पुढील पिढीने काय करणे आवश्यक आहे?**
असे म्हटले जाते की दोन पिढ्यांमध्ये सर्व स्थलांतरित कुटुंबे अमेरिकेच्या मुख्य प्रवाहातील समाजात पूर्णपणे मिसळून जातात. त्यामुळे मराठी भाषा आणि संस्कृती कायमस्वरूपी टिकवून ठेवणे अत्यंत कठीण होईल.

**१०) या संस्थेचे भवितव्य आपण कसे पाहता?**
दरवर्षी नवीन मराठी लोकांचा गट अमेरिकेत येत राहिला, तर MMD चे भविष्य नक्कीच उज्ज्वल आहे. आपण योग्य दिशेने वाटचाल करत आहोत आणि आपले मंडळ दरवर्षी आणखी मजबूत होत जाईल. मात्र, जर राजकीय निर्णयांमुळे स्थलांतराचे प्रमाण किंवा H1B किंवा F1 व्हिसावर येणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली, तर सर्वच स्थलांतरित समाजांवर त्याचा गंभीर परिणाम होईल.

**११) मंडळ आपल्याला किंवा आपल्या सारख्या अनेकांना कश्या प्रकारे मदत करून शकते ? कार्यक्रमादिवशी किंवा इतर वेळी ?**
MMD ने "Senior Services" नावाचा एक उपक्रम सुरु केला तर त्याचा खूप फायदा होईल. या उपक्रमाअंतर्गत, समजा ४ स्वयंसेवकांची एक टीम असेल आणि प्रत्येक स्वयंसेवकाने काही ज्येष्ठ नागरिकांच्या संपर्कात राहण्याची जबाबदारी घ्यावी. दर आठवड्याला एका ज्येष्ठ नागरिकाला फोन करून, "तुम्हाला काही हवे आहे का?" अशी विचारपूस करावी. अनेकदा फक्त "आपली काळजी घेणारे कोणीतरी आहे" हे माहीत असणेही ज्येष्ठ नागरिकांसाठी खूप दिलासादायक असते.
दोन वर्षांपूर्वी एक ज्येष्ठ दाम्पत्य होते. त्यांची आर्थिक परिस्थिती खूप चांगली होती, पण पती-पत्नी दोघेही अपंग होते आणि त्यांना रोज घरचे भारतीय जेवण मिळावे अशी खूप इच्छा होती. आता दोघांचेही निधन झाले आहे. पण अशाच प्रकारचे दुःखद भविष्य अनेक ज्येष्ठ नागरिकांसमोर येऊ शकते आणि अशा वेळी MMD त्यांना खूप मदत करू शकते.

**शिरीष भिंडे**




StateFarm
TROY
2916 E LONG LAKE RD, TROY, MI 4808
PH – 248-250-9708
JAYMUNJ.COM
ROCHESTER
1461 N ROCHESTER RD, ROCHESTER HILLS, MI 48307
PH – 248-218-2526
AGENTJAYMUNJ.COM

JAY MUNJ STATE FARM.

Veg O Rama

dwarkamai
KITCHEN

**Contact: 734-776-8492** 5063 LIVERNOIS ROAD TROY MI 48098
VORTroy_DMK5063@gmailcom



Graham & Ketkar, PLLC

**Immigration Law Expertise**
**Supporting corporate employees and their families**

# का बरं का ?

“तुम्ही मराठी भाषा का शिकता?” असा साधासा प्रश्न वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजे अगदी पहिल्या दिवशी, पहिल्या तासालाच आम्ही मुलांना विचारला. आपल्याला साधा सोपा वाटणारा प्रश्न मुलांना मात्र गोंधळात टाकणारा होता - खरं उत्तर द्यावं तरी प्रॉब्लेम, न द्यावं तरीही प्रॉब्लेम ! कोणी काही बोलेचना. मग आम्हीच मुलांना ४ पर्याय दिले आणि कोऱ्या कागदावर फक्त पर्याय क्रमांक लिहायला सांगितला. नाव - गाव लिहिण्याची गरज नाही. तुम्ही हेच उत्तर हा बरं दिलं ? असं सुद्धा आम्ही विचारणार नाही. कोणाला judge करणार नाही आणि यातलं कोणतंही उत्तर चूक नाही याची खात्री मुलांना दिली.

मुलांना दिलेले पर्याय असे होते -
१. आई बाबा जबरदस्ती शाळेत पाठवतात म्हणून
२. मला मराठी शिकायला आवडतं म्हणून
३. मराठी हे भारतातील माझ्या कुटुंबाशी संवादाचं साधन आहे म्हणून
४. मी हे का करतोय/ करतेय मला माहिती नाही.
(मुलांना प्रश्न आणि पर्याय शुद्ध इंग्रजीत लिहून दिले होते. चिंता नसावी.)

पहिला पर्याय फळ्यावर लिहिताच वर्गात एकच हशा पिकला. मुलांनी हसून दिलेली दाद, पहिल्या पर्यायाला त्यांची मूक संमती दर्शवत होती. बाकी उत्तरं तर फक्त formality होती, उत्तर देणाऱ्यांसाठी आणि विचारणाऱ्यांसाठी सुद्धा. २४ पैकी ११ मुलांनी ‘मराठी हे भारतातील माझ्या कुटुंबाशी संवादाचं साधन आहे म्हणून’ हा पर्याय निवडला, ३ मुलांनी ‘मला मराठी शिकायला आवडतं म्हणून’ असं उत्तर दिलं तर ६ मुलांनी ‘आई बाबा जबरदस्ती शाळेत पाठवतात म्हणून’ हा पर्याय आणि ४ मुलांनी ‘मी हे का करतोय/करतेय मला माहिती नाही’ हा पर्याय निवडला.

आम्ही तुमच्या जागी, तुमच्या वयाचे असतो तर आम्ही पण पर्याय १ च निवडला असता असं सांगितल्यावर मुलांना आश्चर्य वाटलं आणि हसू सुद्धा आलं. "या वयात बऱ्याचश्या गोष्टी आपण आईबाबा सांगतात म्हणूनच करत असतो. पण ते त्या गोष्टी आपल्याला का करायला सांगतात हे मात्र आपण समजूनच घेत नाही आणि मग ती गोष्ट आपल्याला नकोशी होते, जबरदस्ती वाटते. कोणतीही भाषा शिकण्याचे खूप फायदे असतात ते तुम्हाला माहिती आहेत का ?" या प्रश्नाचं उत्तर अर्थातच मुलांकडे नव्हतं.

मग आम्ही हसत खेळत प्रत्येकाने आपली मातृभाषा का शिकायला हवी याचा शोध घेतला. आपली मातृभाषा ही "Family treasure" सारखी असते जी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केली जाते, ती टिकवण्याचं, पुढे pass on करण्याचं काम आपलं आहे, मातृभाषा ही आपल्या identity चा भाग असते आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी जोडून ठेवायला तिची मदत होते; या सारख्या अवघड गोष्टी secret code analogy, roots analogy वापरून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मराठीचा तास असला तरी चर्चा करताना आम्ही इंग्रजीची मदत घेतली कारण मुलांना मुद्दा कळणं महत्वाचं होतं.

एवढं सगळं lecture देण्यामागे ‘आई बाबा जबरदस्ती शाळेत पाठवतात म्हणून’ पासून ‘मला मराठी शिकायला आवडतं म्हणून’ असं मुलांचं मत परिवर्तन करण्याचा उद्देश नक्कीच नव्हता मात्र या चर्चेमुळे ‘मी हे का करतोय/करतेय मला माहिती नाही.’ असं प्रामाणिकपणे सांगणाऱ्या मुलांच्या मनातील गोंधळ कमी व्हावा आणि आपण मराठी का शिकतोय? या प्रश्नाचं एक तरी उत्तर त्यांना सापडावं हा होता.

हे झालं मुलांचं; पण पालकांना तरी bilingual brain चे फायदे नक्की माहिती आहेत का? पालक म्हणून आपल्यातही मत-मतांतरं असतातच. एका पालकाला मराठीचा जाज्वल्य अभिमान असतो, तर त्याच्याच जोडीदाराला मात्र "कशासाठी इतकी उठाठेव, इथं राहून ह्या सगळ्याचा काही उपयोग आहे का ?" असा प्रश्न पडलेला असतो. मग त्यावरून घरात भांडणं नकोत किंवा मग इतर कोणी पाठवतायत म्हणून आपण मुलांना मराठी शाळेत पाठवतो.म्हणजे “का बरं का?” हा प्रश्न मुलांप्रमाणेच बहुतांश पालकांच्या मनात सुद्धा असतोच.

तुम्हाला हे माहिती आहे का ? - ज्या व्यक्तीला फक्त एकच भाषा येते ती व्यक्ती एकाहून जास्त भाषा येणाऱ्या व्यक्तीच्या तुलनेत ४-५ वर्षं लवकर म्हातारी (cognitive decline) होते. म्हणजेच एक भाषा जाणणाऱ्या व्यक्तीचा मेंदू ६० व्या वर्षी म्हातारा होतो असं आपण समजलं तर दोन भाषा जाणणाऱ्या व्यक्तीचा मेंदू ६५ वर्ष, तीन भाषा जाणणाऱ्या व्यक्तीचा मेंदू ७० व्या वर्षी म्हातारा होऊ लागतो. सोप्या शब्दात सांगायचं तर - multilingualism enhances cognitive reserve, which helps delay age-related cognitive decline.

द्विभाषिकता / बहुभाषिकता मेंदूच्या कार्यक्षमतेत आणि कार्यकारी नियंत्रणात सुधारणा करून cognitive reserve वाढवते, कारण दोन भाषा सतत हाताळल्यामुळे मेंदू अधिक कार्यक्षम बनतो. या द्विभाषिक प्रक्रियेमुळे synaptic plasticity ला चालना मिळते, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता सुधारते आणि एकभाषिक व्यक्तींच्या तुलनेत डिमेन्शिया ४–५ वर्षे उशिरा होतो. जितक्या लहान वयात आपण द्विभाषिकता आत्मसात करू तितक्या लवकर आणि जास्त प्रमाणात synaptic plasticity ला चालना मिळते, मेंदूच्या prefrontal regions मध्ये gray matter चा विकास अधिक चांगल्या प्रकारे होतो आणि पुढील आयुष्यात डिमेन्शिया सारखे neurodegenerative विकार दूर ठेवण्यास मदत होते.

द्विभाषिक / बहुभाषिक मुलं इतरही अनेक गोष्टीत चांगली असतात. या मुलांमध्ये prefrontal cortex चा विकास चांगला होतो. मेंदूचा prefrontal cortex हा भाग निर्णय क्षमता म्हणजेच decision making आणि multitasking शी निगडित असतो. आणि त्यातच जर तुम्ही शिकत असलेली भाषा तुमची मातृभाषा असेल तर cognitive benefits सोबतच इतरही personal आणि cultural benefits नक्की मिळतील यावर आपलं दुमत नसेल.

Physical exercise केल्याने स्नायूंना जशी बळकटी येते तसेच वेगवेगळ्या भाषा शिकल्याने मेंदू बळकट होतो. जेंव्हा आपण gym join करतो तेंव्हा “बॉडी बिल्डर” होण्यासाठी नव्हे तर basic fitness यावा हाच आपला हेतू असतो ना ? तसंच मराठी शाळेत जाऊन मराठीत आपल्याला PhD करायचं नाहीये हे नक्की , पण आपल्या मुलांच्या cognitive आणि cultural विकासाठी मराठी शिकणे फायद्याचे आहे हे जरी पालक म्हणून आपल्याला पटले तरी खूप झाले.
